# प्रकरण दुसरे

## संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती

# प्रकरण दुसरे

# 'संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती'

## (The Research Problem and Methodology)

**प्रस्तावना :**

या प्रकरणात उपलब्ध साहित्याचे परिशीलन (Review of Literature)आणि प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेली समस्या आणि अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन करण्यात आले आहे.

## अ) उपलब्ध साहित्याचे सर्वेक्षण (Review of Literature)

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानासंदर्भात फारसे संशोधनात्मक लिखाण झाले नसल्याचे प्रस्तुत संशोधिकेला दिसून आले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील एम.ए. च्या दहा विद्यार्थ्यांनी दहा वेगवेगळ्या गावांचे अवलोकन करून त्यासंबंधी प्रकल्प अहवाल तयार केले आहेत.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानासंबंधी चव्हाण आर. पी. यांनी करवीर तालुक्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील पाचगाव, पुजारी एस.आर. यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या चंदगड तालुक्यातील शिवणगे, पवार एन. ए. यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील पाटेकरवाडी, कावरे, ए. एन. यांनी सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यातील उजनी, कांबळे एस. एन. यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या राधानगरी तालुक्यातील कांबळवाडी, जोई व्ही. आर. यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या गडहिंग्लज तालुक्यातील गिजवणे, शिरगे एम. एस. यांनी सांगली जिल्ह्याच्या पलूस तालुक्यातील अंकलकोप, यादव डी. एन. यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या राधानगरी तालुक्यातील कुंभारवाडी, वायदंडे जे. आर. यांनी सातारा जिल्ह्याच्या कोरेगाव तालुक्यातील धामणेर, सुतार एम. ए. यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या कागल तालुक्यातील बाळेघोल गावांचा अभ्यास करून अहवाल

तयार केले आहेत.

तथ्य संकलनासाठी त्यांनी त्या त्या गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षण करणे, गावातील प्रमुख व्यक्तींच्या तसेच निवडक ग्रामस्थांच्या मुलाखती घेणे, गावातील बदललेल्या परिस्थितीची छायाचित्रे घेणे तसेच अभियानाच्या अंमलबजावणी संबंधीचा अहवाल घेऊन त्यातून माहिती मिळविणे या तंत्रांचा अवलंब केला होता. या प्रकल्प अहवालात त्या त्या गावात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे वर्णन तसेच स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, व्यक्तिगत आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन या संदर्भात कोणते बदल घडून आले याविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

वरील सर्व गावासंबंधी जी निरीक्षणे प्रकल्प अहवालात नोंदविली आहेत त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

१) रस्ते साफसफाई : ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत जे कार्यक्रम राबविले त्यामुळे विविध गावातील रस्ते स्वच्छ व सुंदर बनले आहेत. लोकवर्गणीतून व ग्रामस्थांच्या श्रमदानातून रस्ते स्वच्छ करून व त्यांचे डांबरीकरण केले आहे. रस्त्यावरील गोळा केलेला केरकचरा खतासाठी कचराकोंडाळ्यात साठवला जात असल्याचे प्रकल्प अहवालात नमूद केले आहे.

२) गटारांचे बांधकाम : अभियानांतर्गत गावातील रस्त्यांच्या दुतर्फा गटारांचे बांधकाम केले असून गावातील सांडपाणी गटारामार्फत संकलनासाठीच्या खड्ड्यात सोडून त्या सांडपाण्याचा पुर्न:वापर परसबागा फुलविण्यासाठी केला असल्याचे निरीक्षण प्रकल्प अहवालात नोंदविले आहे.

३) कचरा निर्मुलन : अभ्यासलेल्या गावात कचरा साठवणीसाठी जागोजागी कचरा कुंड्या लावलेल्या असून कचरा निर्मुलन वेळच्यावेळी होते आणि कचरा ओला व

सुका असे वर्गीकरण करून त्यांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था गावाच्या बाहेर केलेली असल्याचे निरीक्षण अहवालात नोंदविले आहे.

४) सार्वजनिक इमारती, शाळा व घरे : गावातील संपूर्ण घरे, सार्वजनिक इमारती व शाळेच्या इमारती एकाच रंगाने रंगविलेल्या असून शाळेवर विविध घोषवाक्ये लिहिलेली आहेत. शाळेचा परिसर अतिशय स्वच्छ व सुंदर असल्याचे निरीक्षण अहवालात नोंदविले आहे.

५) शौचालय व्यवस्था : अभियानामुळे त्या त्या गावातील शौचालयांची संख्या वाढलेली असून त्यांचा वापरही होत असल्याचे निरीक्षण अभ्यासकांनी नोंदविले आहे. काही गावे (उदा. कांबळवाडी, शिवणगे, धामणेर) हागणदारीमुक्त झाली आहेत.

६) पिण्याचे पाणी व्यवस्थापन : अभ्यास केलेल्या प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्यात टी.सी.एल. पावडर वापरली जात असून शुद्ध पिण्याच्या पाण्याचा वापर केला जातो. त्यामुळे गावात पाण्यापासूनचे कोणतेही साथीचे रोग नसल्याचे प्रकल्प अहवालात नमूद केले आहे.

७) सांडपाणी व्यवस्थापन : अभ्यास केलेल्या प्रत्येक गावात सांडपाण्याचे व्यवस्थापन व्यवस्थित केले आहे. ज्या घरांना गटारे जोडली गेली नाहीत, त्यांच्यासाठी शोषखड्डे बांधून दिलेले आहेत तसेच गटारांमार्फत सांडपाणी काही गावात शेतीसाठी तर काही गावात परसबागा फुलविण्यासाठी वापरले जाते. तसेच काही कुटुंबांनी सांडपाण्यावर घराभोवती परसबाग तयार केली आहे. त्यामुळे रस्त्यावर कोठेही सांडपाणी दिसत नसल्याचे निरीक्षण विद्यार्थ्यांनी अहवालात नोंदविले आहे.

८) वृक्षारोपण : पर्यावरण संतुलनासाठी गावातील रस्त्यांच्या दुतर्फा दुरांडा, औषधी वनस्पती, नारळ, बदाम, केळी, उलटा अशोक, ओक, बाणवली, आंबा, वेगवेगळ्या फुलांची अशी अनेक प्रकारची झाडे लावली आहेत. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विविध

गावात लावलेल्या वृक्षांची संख्या वेगवेगळी आहे. (शिवणगे ६५०, कुंभारवाडी १००, कांबळवाडी २०,०००, बाळेघोल ८००, पाटेकरवाडी १५६, उजनी १०,०००, अंकलकोप १,००,००० आणि धामणेर ५६१५) पाचगाव व गिजवणे गावातही अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले असून त्यापैकी जिवंत असलेल्या झाडांचे आजही वृक्षसंवर्धन व्यवस्थितरित्या केले असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

९) अपारंपारिक ऊर्जेचा वापर : अनेक गावात बायोगॅस प्लँट असून प्रत्येक गावात निर्धुर चूल, सिलेंडर, गोबर गॅस, सोलर कुकरचा लोक वापर करतात. तसेच कांबळवाडी गावात सौर व पवन ऊर्जेच्या वापराने गाव विद्युतदृष्ट्या स्वयंपूर्ण असून अंगणवाडीसाठी सौर चुलीचा वापर होतो.

१०) जनावरे स्वच्छता : प्रत्येक गावात जनावरे व गोठा स्वच्छ ठेवला जातो. वेळोवेळी जनावरांची पशूवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून लसीकरण केले जाते.

११) व्यक्तिगत आरोग्य : स्वच्छता अभियानामुळे ग्रामस्थ वैयक्तिक स्वच्छतेमध्ये जेवणापूर्वी व शौचालयाला जाऊन आल्यानंतर साबणाने हात धुतात, अंघोळीसाठी नियमित साबणाचा वापर करतात. केस स्वच्छ ठेवणे, नखे काढणे, केस कापणे इ. गोष्टींकडे अधिक लक्ष दिले जाते. शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेमध्ये गणवेश स्वच्छता, नखे तपासणी, अंघोळीसाठी साबणाचा, शौचालयाला जाऊन आल्यावर, जेवणापूर्वी व जेवणानंतर साबणाने हात धुतात कि नाही याची नेहमी तपासणी केली जाते. सर्व गावात सदृढ बालक स्पर्धा, शाळेत स्वच्छतेचे महत्त्व सांगणारी निंबध स्पर्धा घेण्यात आलेल्या आहेत, असे विद्यार्थ्यांच्या प्रकल्प अहवालात नमूद केल्याचे दिसून येते.

१२) व्यसनमुक्ती : अनेक गावात व्यसनमुक्तीसाठी प्रकल्प केले आहेत. याबरोबर प्लॅस्टिकबंदी, वृक्षतोडबंदी, कुऱ्हाडबंदी ही झालेली असल्याचे प्रकल्प अहवालात नमूद केले आहे.

१३) हिंदू-मुस्लिम ऐक्य : धामणेर गावात एक अनोखे हिंदू-मुस्लिम ऐक्य पहावयास मिळते. पूर्वीच्या ग्रामपंचायतीजवळच मशीद होती. पण ग्रामपंचायतीची मोठी वास्तू निर्माण करत असताना या मशीदचा अडथळा होत होता. तेव्हा मुस्लिम बांधवांनी मशीद हलविण्यास परवानगी दिली आणि ग्रामपंचायीने ठरवून दिलेल्या नियोजित जागेवर मशीद बांधण्यास अनुमती दर्शविली.

१४) संस्कार वाहिनी व गृहस्वामीनी योजना : कांबळवाडी गावाची स्वत:ची संस्कारवाहिनी असून रोज सकाळी संस्कारक्षम कार्यक्रम ऐकवले जातात. गावातील महिलांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा देण्यासाठी तसेच त्यांचे संपत्तीविषयक हक्क सुरक्षित राहण्यासाठी गावात गृहस्वामिनी योजनेद्वारे गावातील कुटुंबांची राहती घरे महिलांच्या नावावर कायदेशीररित्या करण्यात आली आहेत.

**ब) संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती:**

(The Research Problem and Methodology)

प्रस्तुत लघुशोधप्रबंधासाठी (Dissertation) निवडलेली समस्या आणि अवलंबिण्यात आलेली संशोधन पद्धती याविषयीचे थोडक्यात विवेचन या विभागात करण्यात आलेले आहे.

**१) संशोधन समस्या** (The Research Problem) :

"ग्रामीण महाराष्ट्रातील पाणी पुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता कार्यक्रम : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या विशेष संदर्भात जैन्याळ गावाचे व्यष्टी अध्ययन" हे प्रस्तुत लघु शोधप्रबंधाचे (Dissertation) शीर्षक आहे. **पाणी पुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छतेच्या संदर्भात जैन्याळ गावात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची झालेली अंमलबजावणी आणि त्यामुळे घडून आलेला सामाजिक आणि पर्यावरणीय बदलांचा शोध घेणे ही प्रस्तुत अभ्यासासाठीची समस्या आहे.**

**२) अभ्यासाची उद्दिष्ट्ये** (Objectives of the study):

अ) महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या स्वरूपाचा आणि त्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

ब) जैन्याळ गावात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची कशी अंमलबजावणी झाली याचा अभ्यास करणे.

क) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे जैन्याळ गावात घडून आलेल्या पर्यावरणीय आणि सामाजिक परिवर्तनांचा अभ्यास करणे.

**३) अवलंबिलेली संशोधन पद्धती** (Research method used) :

प्रस्तुत संशोधनासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन खाली दिले आहे.

**अ) संशोधन क्षेत्र (Locale of the study)**

प्रस्तुत अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील 'जैन्याळ' गावाची संशोधन क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे. जैन्याळ गावाची निवड सहेतुक नमुना निवड पद्धती (Purposive sampling) द्वारे केली आहे.

यासाठी प्रथम जिल्हा परिषद, कोल्हापूर कार्यालयातून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत पारितोषिक मिळविलेल्या गावांची माहिती मिळविली. ती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषद स्तरावर सन २०००-०१ ते २००५-०६ अखेर जिल्हा स्तरावरील पुरस्कार मिळालेल्या गामपंचायतींची माहिती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | वर्ष | पारितोषिक स्तर | गावांची नावे | तालुका |
|---|---|---|---|---|
| १ | २०००-०१ | प्रथम | मजरे-कार्वे | चंदगड |
| | | द्वितीय | दत्तवाड | शिरोळ |
| | | तृतीय | सडोली-खालसा | करवीर |
| २ | २००१-०२ | प्रथम | बहिरेवाडी | पन्हाळा |
| | | द्वितीय | आमशी | करवीर |
| | | तृतीय | चंद्रे | राधानगरी |
| | | (विभागून) | मजरेवाडी | शिरोळ |
| ३ | २००२-०३ | प्रथम | आमशी | करवीर |
| | | द्वितीय | मडिलगे खुर्द | भुदरगड |
| | | (विभागून) | जैन्याळ | कागल |
| | | तृतीय | सवते | शाहूवाडी |
| | | (विभागून) | खालसा | पन्हाळा |
| ४ | २००३-०४ | प्रथम | जैन्याळ | कागल |
| | | द्वितीय | निलेवाडी | हातकणंगले |
| | | तृतीय | मुसळवाडी | राधानगरी |
| ५ | २००४-२००५ | प्रथम | कांबळवाडी | राधानगरी |
| | | द्वितीय | निलेवाडी | हातकणंगले |
| | | (विभागून) | कुंभारवाडी | राधानगरी |
| | | तृतीय | शिवणगे | चंदगड |
| | | (विभागून) | माजगाव | पन्हाळा |
| ६ | २००५-०६ | प्रथम | कांबळवाडी | राधानगरी |
| | | द्वितीय | शेळकेवाडी | करवीर |
| | | (विभागून) | निलेवाडी | हातकणंगले |
| | | तृतीय | शिवणगे | चंदगड |

वरीलपैकी जैन्याळ गावाची हेतुत: (Purposively) निवड केली कारण :

१) जैन्याळ गावाला सन २००२-०३ मध्ये जिल्हापातळीवर विभागून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

२) सन २००३-०४ मध्ये मात्र याच जैन्याळ गावाला तालुक्यात, जिल्ह्यात, विभागात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

३) गावाला दिलेल्या प्रथम भेटीच्या वेळी तेथील ग्रामसेवक आणि सरपंच यांनी अभ्यासाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**ब) उत्तरदात्यांची निवड** (Selection of the sample respondents):

प्रथम ग्रामस्वच्छता अभियानासंदर्भातील ग्रामसेवकाने तयार केलेला अहवाल जैन्याळ ग्रामपंचायत कार्यालयातून मिळविला. त्यानुसार जैन्याळ गावात एकुण २८६ इतकी कुटुंबे असल्याचे दिसून आले.

संशोधनासाठी उपलब्ध कालावधी, श्रम आणि वेळ या सर्व बाबींचा विचार करून अपघाती नमुना निवड (Accidental Sampling) या नमुना निवड तंत्राचा वापर करून जैन्याळ गावातील ७५ कुटुंबाची निवड करण्यात आली.

वरीलप्रमाणे निवडलेल्या ७५ कुटुंबापैकी प्रत्येक कुटुंबातील एका जेष्ठ महिला सदस्याची प्रस्तुत अभ्यासासाठी उत्तरदाता म्हणुन निवड केली. याशिवाय संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीत सक्रिय सहभाग घेतलेल्या महत्वपूर्ण व्यक्तींचीही (गावाचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका, महिला मंडळाचे अध्यक्ष आणि तरूण मंडळाचे अध्यक्ष) उत्तरदाते म्हणून (Key informants) हेतुपूर्वक निवड केली.

**४) माहिती संकलनाची तंत्रे** (Techniques of data collection)

प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती संकलनाच्या खालील तंत्राचा वापर करण्यात आला.

**अ) मुलाखत अनुसूची** (Interview schedule)

अभ्यासाची उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेऊन प्राथमिक स्वरूपाची माहिती गोळा करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार केली. तिची पुर्व चाचणी (Per-testing) घेण्यात आली. आवश्यक त्या दुरूस्त्या मुलाखत अनुसूचित केल्या. या मुलाखत अनुसूचीचा वापर करून ७५ कुटुंबातील महिला उत्तरदात्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहिती संकलित करण्यात आली.

**ब) व्यक्तिगत निरीक्षण पध्दती** (Personal Observation):

पाणी पुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता याबाबत तथ्य संकलनासाठी व्यक्तिगत निरीक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**क) अनौपचारिक मुलाखती** (Informal Interviews):

गावातील प्रमुख निवडक उत्तरदात्यांच्या अनौपचारिक मुलाखती घेण्यात आल्या यात प्रामुख्याने  सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, महिला मंडळाचे अध्यक्ष, तरूण मंडळाचे अध्यक्ष इ. च्या मुलाखती घेण्यात आल्या.

**ड) छायाचित्रे** (Photographs):

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविल्यामुळे सध्या जैन्याळ गावात कोणते बदल दिसून येतात, यासंबंधीची छायाचित्रे घेण्यात आली आहेत. शिवाय या गावाची पूर्वीची स्थिती कशी होती हे दर्शविणारी छायाचित्रे ग्रामपंचायत कार्यालयातून संकलीत केली.

**५) अभ्यासाचा कालावधी** (Period of the study):

जैन्याळ गावाला दिनांक १५ आक्टोंबर २००४ ते दिनांक २० डिसेंबर २००६ पर्यंत ८ वेळा भेटी दिल्या. या भेटीच्या वेळी माहिती संकलीत करण्यात आली. मुलाखत अनुसूचिच्या साहाय्याने निवडलेल्या नमुन्यातील उत्तरदात्यांकडून माहिती संकलित करण्याचे काम दि. २ जून ते १० जून या कालावधीत प्रामुख्याने करण्यात आले आहे. दि. २ जून ते ७ जून या कालावधीत जैन्याळ गावात राहून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने नमुन्यातील उत्तरदात्यांकडून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**६) माहिती प्रक्रियन** (Data Processing):

जैन्याळ गावाला दिलेल्या भेटींच्या वेळी मिळालेल्या माहितीची टिपणे काढून ठेवली होती. वर्तमान पत्रात आलेल्या जैन्याळ विषयीच्या बातम्यांचे संकलनही केले होते. मुलाखत अनुसूचिद्वारे मिळविलेल्या माहितीचे संकेतीकरण (Coding) केले नंतर समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ येथील संगणक प्रयोगशाळेत SPSS या Software चा वापर करून संगणकाच्या साहाय्याने माहितीवर प्रक्रिया करून सारण्या तयार करण्यात आल्या. वरील सर्व माहितीचा उपयोग अहवाल लेखन करताना केला आहे.

**७) उपयोगात आणलेल्या माहितीचे उगमस्त्रोत** (Sources of Data):

प्रस्तुत अभ्यासासाठी प्राथमिक तसेच दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या माहिती स्त्रोतातून संकलित केलेल्या माहितीचा वापर करण्यात आला आहे.

**अ) प्राथमिक माहिती स्त्रोत** (Primary Data) :

संशोधकाने स्वत: जैन्याळ गावाला भेटी देऊन केलेले निरीक्षण, घेतलेल्या मुलाखती, मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने मिळविलेली माहिती तसेच छायाचित्रांद्वारे मिळविलेली माहिती इ.चा वापर प्रस्तुत अहवालासाठी करण्यात आला आहे.

**ब) दुय्यम माहिती स्त्रोत (Secondary Sources of Data):**

शासकीय परिपत्रके, प्रकल्प अहवाल, पुस्तिका, संशोधन नियतकालिके, इंटरनेटवरून मिळवलेली माहिती व ग्रामपंचायत कार्यालयातील अहवाल इ. दुय्यम माहितीचे स्त्रोत आहेत.

**८) लघुशोधप्रबंधाची रूपरेषा (Outline of Dissertation):**

प्रस्तुत संशोधन लघुशोधप्रबंधाची विभागणी पुढीलप्रमाणे पाच प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले: ''संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरूप''.

प्रकरण दुसरे: ''संशोधन समस्या आणि संशोधन पध्दती''.

प्रकरण तिसरे: ''जैन्याळ गावातील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी''.

प्रकरण चौथे: ''संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा जैन्याळ गावावरील प्रभाव''.

प्रकरण पाचवे: ''सारांश आणि निष्कर्ष''.

यापुढील प्रकरणात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची जैन्याळ गावातील अंमलबजावणी याविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

## संदर्भ सूची (REFERENCES) :


1 Chavan R.P. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Pachagaov village, Taluka -Karveer, Dist-Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

2 Pujari S.R. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Shivange, Taluka-chandgad, Dist Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

3 Powar N.A. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Patekarwadi village, Taluka-Karver, Dist - Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

4 Kaware A.N. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Ujani village, (TEM) Taluka-Madha, Dist Solhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

5 Kamble S.N. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Kambalwadi village, Taluka-Radhanagri, Dist Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

6 Joi V.R. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Gijavane village, Taluka-Gadhiglaj, Dist Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

7 Shirge M.S. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Ankalkhop village, Taluka-Palus, Dist - Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

8 Yadav D.N. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Kumbharwadi village, Taluka-Radhanagari,

Dist Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

9 Waydande J. R. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Dhamner village, Taluka-Koregaov, Dist-Satara", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.

10 Sutar M.A. "Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan and Rural Environment: A study of Baleghol village, Taluka-Kagal, Dist-Kolhapur", Unpublished M.A.project Report, Department of Sociology, Shivaji University, Kolhapur 2005-2006.